पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ८०९ /२०१३
दिनांक : ३१ / ०८ / २०१३

प्रति,

मा.......................
सदस्य, विधी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची सभा
दिनांक **०६/०९/२०१३** रोजी आयोजित केलेबाबत ....

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०६/०९/२०१३** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८.

मा.विधी समिती सभा

**कार्यपत्रिका क्रमांक ७**

दिनांक : **०६/०९/२०१३** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०६/०९/२०१३** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

**विषय क्र.१)** श्री.प्रमोद भोसले, मुख्यलेखापाल यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार मुख्यलेखापाल पदावरील नियुक्तीसंदर्भात मे.उच्च न्यायालयामध्ये रिट पिटिशन स्टॅम्प क्र. २३३१७/२०१२ पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ विरुध्द महाराष्ट्र शासन व पिं.चिं.मनपा या दाव्यामध्ये होणा-या अंतिम निर्णयाचे अधीन राहून २३/०७/२०१३ पासून पुढे ०१ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

(दिनांक ०६/०९/२०१३ चे सभेत घेण्याचे निर्णयाप्रमाणे)

**विषय क्र.२)** मनपाच्या वाहतूक नियोजन कक्षाकडील विषयपत्रानुसार ब प्रभागात पिंपरी रेल्वे स्टेशन ते मुंबई-पुणे हायवे वरील फिनोलेक्स कंपनी चौक व डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत ४.०० मी.रुंदीचा फुटपाथ करणेकामी येणारे र.रु.९,००,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख फक्त) चे पुर्णगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.३)** मनपाच्या वाहतूक नियोजन कक्षाकडील विषयपत्रानुसार कृष्णानगर, देहू आळंदी रस्ता परिसरात व इतर चौकामध्ये व रस्त्यांची वाहतूक सुधारणा विषयक कामे करणेकामी येणारे र.रु.९,००,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख फक्त) चे पुर्णगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.४)** मनपाच्या वाहतूक नियोजन कक्षाकडील विषयपत्रानुसार अ प्रभाग कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यावरील शाळा, हॉस्पिटल परिसरात विद्यार्थ्यांना, नागरिकांना सुरक्षित रस्ता ओलांडणेच्या सुविधा तयार करणेकामी येणारे र.रु.९,००,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख फक्त) चे पुर्णगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.५)** मनपाच्या वाहतूक नियोजन कक्षाकडील विषयपत्रानुसार यमुनानगर, प्राधिकरण परिसरात व इतर चौकामध्ये व रस्त्यांची वाहतूक सुधारणा विषयक कामे करणेकामी येणारे र.रु.९,००,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख फक्त) चे

पुर्णगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.६)** मनपाच्या वाहतूक नियोजन कक्षाकडील विषयपत्रानुसार ब प्रभाग कार्यक्षेत्रातील मुख्य रस्त्यावरील शाळा, परिसरात विद्यार्थ्यांना, नागरिकांना सुरक्षित रस्ता ओलांडणेच्या सुविधा तयार करणेकामी येणारे र.रु.९,००,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख फक्त) चे पुर्णगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.७)** मनपाच्या वाहतूक नियोजन कक्षाकडील विषयपत्रानुसार क प्रभागात दापोडी रेल्वे स्टेशन ते मुंबई - पुणे हायवे पर्यंत ४ मी. रुंदीचा फुटपाथ करणेकामी येणारे र.रु.९,००,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख फक्त) चे पुर्णगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.८)** मनपाच्या वाहतूक नियोजन कक्षाकडील विषयपत्रानुसार ड प्रभागात काळेवाडी रहाटणी परिसरातील रस्त्यावर व चौकामध्ये वाहतूक सुधारणा विषयक कामे करणेकामी येणारे र.रु.९,००,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख फक्त) चे पुर्णगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.९)** मनपाच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील विषयपत्रानुसार कासारवाडी येथे मनपामार्फत मैलाशुध्दीकरणासाठी टप्पा क्र.१, २ व ३ असे एकूण तीन Sewage Treatment Plant आहेत. सदर प्लॅन्ट मध्ये सद्यस्थितीत सर्वसाधारण ७४ ते ८० एम.एल.डी. मैला पाण्यावर प्रक्रिया केली जाते. सद्यस्थितीत प्रक्रियायुक्त पाण्याचा पुनर्वापर काही प्रमाणात उद्यानासाठी करणेत येतो व उर्वरित पाणी नदीपात्रामध्ये सोडणेत येते. CME येथे कासारवाडी STP पासून पंपिंगद्वारे पाणी पुरविणेच्या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर कामासाठी एकूण अंदाजपत्रकीय र.रु.२,४७,४८,२११/- इतकी येत असलेबाबत दिनांक २५/०७/२०१३ चे पत्रानुसार सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम मनपाकडे डिपॉझीट म्हणून जमा करणेची, तसेच या रक्कमेतून काम पूर्ण झालेनंतर देखभाल, दुरुस्तीकामी प्रतिमहिना आवश्यक ती रक्कम देणेची संमती दर्शविलेली आहे. तसेच सदरचे काम त्यांनी त्वरित पूर्ण करुन देणेबाबत कळविले आहे. परंतु सदर कामासाठी CME यांचेकडून सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकानंतर (म्हणजे २५ जुलै २०१३ रोजी) पत्र मिळाले असून या विभागामार्फत सदर कामाचे खर्चासाठीची तरतुद या वर्षाच्या मनपाच्या अंदाजपत्रका मध्ये करणेत आलेली नाही. परंतु सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम CME कडून जमा होणार असल्याने त्या रकमेतून सदर काम मनपामार्फत करुन घेणेस येणारे अंदाजे सुमारे २,४८,००,०००/- चे रकमेस

प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.१०)** अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील विषयपत्रानुसार निगडी से.क्र.२२ येथील गुरुदत्त उद्यानाचे नुतनीकरण करणे या कामातून अ प्रभागातील इतर उद्यानांची देखभाल दुरुस्तीची कामे करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.११)** ब मुख्यालयाकडील विषयपत्रानुसार मनपाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये नुतनीकरण करणेच्या कामाचे सुधारित वाढीव अं.र.रु.२१,९९,२०६/- (अक्षरी र.रु.एकवीस लाख नव्याण्णव हजार दोनशे सहा फक्त )चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.१२)** मनपाचे बीआरटीएस विभागाकडील विषयपत्रानुसार जुन्या मुंबई पुणे रस्त्यावरील भक्ती-शक्ती चौक येथे बस टर्मिनल विकसित करणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खाते यांचेकडील सन १२-१३ च्या दरसूचीनुसार पत्रक तयार केले आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु.२,९०,४४,७१०/-( अक्षरी र.रु.दोन कोटी नव्वद लाख चौव्वेचाळीस हजार सातशे दहा फक्त्) इतकी आहे. सदर काम पूर्ण करणेस एकूण १२ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. सदरचे कामास सन २०१३-१४ मध्ये एकूण २,९०,००,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली आहे.(पानांक ४८ अ.क्र.१४/१३७) सदर बस टर्मिनलचे क्षेत्रफळ २१०० चौ.मी. असून त्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे. १२) बांधकामाचा प्रकार-वीट बांधकाम १३) छताचा प्रकार- GI Sheet १४) Flooring - Anti Skid flooring १५) भिंतीस Aluminum Cladding १६) Control Room १७) Ticket Counter १८) Separate Plat form for BRT & Private buses १९) Rest Room for bus Driver २०) Waiting area for passengers २१) Parking for private vehicles २२) Toilet block याकामी येणा-या र.रु.२,९०,४४,७१०/- (अक्षरी र.रु.दोन कोटी नव्वद लाख चौव्वेचाळीस हजार सातशे दहा फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.१३)** ब प्रभाग स्थापत्य विभागाकडील विषयपत्रानुसार प्रभाग क्र.१९ (वॉ.क्र.५९) मधील वाल्हेकरवाडी विवेकानंद कॉलनी मधील रस्ते खडीमुरुमाचे व बी.बी.एम.करणेचे काम निविदा र.रु.१८,६६,६६६/- निविदा क्र.२/७२-२०१२/१३ अन्वये मे.ए.डी.देवकर यांना मिळालेले असून सदर कामाचा भाग हा ग्रीन झोन व लाल व निळया पुररेषेने बाधीत क्षेत्रातील असल्याने सदर कामामधून प्रभाग क्र.१९ वाल्हेकरवाडी मधील ठिकठिकाणचे रस्ते खडी मुरुमाचे करणे व रस्त्यांची बी.बी.एम.पध्दतीने दुरुस्ती करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.१४)** क प्रभाग विद्युत विभागाकडील विषयपत्रानुसार भांडार विभागात साहित्य उपलब्ध नसल्याने भोसरी विभागातील दिवाबत्तीची देखभाल व दुरुस्ती करणेच्या कामात अडचणी निर्माण होत आहेत. सदर देखभाल व दुरुस्तीचे काम व्यवस्थित होणेसाठी निविदा नोटीस क्र.११/२६-१२/१३ मधील कामाअंतर्गत असलेल्या परिमाणांमधून टी-५ (४ x २४ वट नळया), ७०/१५० वॅट सोडियम बल्ब, सोडियम चोक, केबल व अनुषंगिक विद्युत विषयक देखभाल दुरुस्ती साहित्य प्रभाग क्र.३२ ते ३५ मध्ये वापरणेस ( Chang of site ) परवानगी देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.१५)** मनपाचे बीआरटीएस विभागाकडील विषयपत्रानुसार औंध रावेत रस्त्यावरील मुकाई चौक येथे बस टर्मिनल विकसित करणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खाते यांचेकडील सन १२-१३ च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयार केले आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु.१,३०,३५,०००/- इतकी आहे. सदर काम पूर्ण करणेस एकूण १२ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. सदरचे कामास सन २०१३-१४ मध्ये एकूण २,९०,००,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली आहे.(पानांक ४८ अ.क्र.१४/१३७) सदर बस टर्मिनलचे क्षेत्रफळ ९२० चौ.मी. असून त्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे. १) बांधकामाचा प्रकार-वीट बांधकाम २) छताचा प्रकार- GI Sheet ३) Flooring - Anti Skid flooring ४) भिंतीस Aluminum Cladding ५) Control Room ६) Ticket Counter ७) Separate Platform for BRT & Private buses ८) Rest Room for bus Driver ९) Waiting area for passengers १०) Parking for private vehicles ११) Toilet block याकामी येणा-या र.रु.१,३०,३५,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी तीस लाख पस्तीस हजार फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.१६)** मनपाचे स्थापत्य विभागाकडील विषयपत्रानुसार क प्रभागात वृक्षारोपणासाठी खड्डे खोदणे व पोयटा माती भरणे कामी (सुधारित प्रशासकीय मान्यता) येणारे र.रु.२२,५३,१८६/- ( अक्षरी र.रु.बावीस लाख त्रेपन्न हजार एकशे शहाऐंशी फक्त) खर्चाचे पुर्वगणपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.१७)** पिंपरी चिंचवड शहराचे सांस्कृतिक आणि कला धोरण मा.महापौर, सन्माननीय पदाधिकारी, शहरातील विविध कला क्षेत्रातील कलावंत आणि सांस्कृतिक संस्था यांच्या कडून प्राप्त झालेल्या सुचना / अभिप्राय विचारात घेऊन तयार करण्यात आले आहे. प्रस्तावा सोबतचे परिशिष्ट अ, ब, क, ड, इ, प, व फ प्रपत्रामध्ये नमुद सांस्कृतिक आणि कला धोरणास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.१८)** मनपा मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये दुस-या मजल्यावरील शिक्षण मंडळ विभागाची बैठक व्यवस्था करणे व जुन्या जी.बी.हॉल मध्ये महिला कक्ष व विविध समित्यांची दालने व बैठक व्यवस्था करणेकामीचे र.रु.३०,००,०००/- ( अक्षरी र.रु.तीस लाख फक्त) चे पुर्वगणनपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.१९)** चीन या देशातील शांग्यांग शहर व पिंपरी चिंचवड शहर यांचेमध्ये उद्योग, व्यापार, तंत्रज्ञान, संस्कृती, आरोग्य याबाबत विचारांचे आदान-प्रदान करुन दोन्ही शहरांचा विकास करण्याच्या उद्येशाने सिस्टर सिटी (Sister City) चा प्रस्ताव महापालिकेस देण्यात आला असून सदर सिस्टर सिटीबाबत सहकार्य करार करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**विषय क्र.२०)** ब प्रभाग स्थापत्य विभागाकडील विषयपत्रानुसार वायसीएम रुग्णालयाची स्थापत्य विषयक विविध दुरुस्ती व सुधारणेची कामे करणेकामी येणारे र.रु.३०,००,०००/- (अक्षरी र.रु.तीस लाख फक्त) चे पुर्वगणनापत्रकास प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ८०९ /२०१३
दिनांक : ३१/०८/२०१३

**टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे ( डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.**